**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.**

**राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2022-2023**

**माध्यमिक शिक्षक गट**

## नवोपक्रम

# माझी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा


उपक्रमकर्ता: श्री.अजित हरी पाटील.

(सहा.शिक्षक)

शाळा: दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार हायस्कूल,

राजापूर . ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

**संपर्क क्रमांक : 9420250878**

**मार्गदर्शक:डॉ.श्रीमती.अंजली रसाळ.**

**(वरिष्ठ अधिव्याख्याता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर )**

## ☯ नवोपक्रमकर्ता परिचय ☯



❖ **नवोपक्रम शीर्षक** : **"माझी इंग्रजी भाषा प्रयोग शाळा"**

❖ **नवोपक्रम कर्त्याचे नाव** : **श्री.अजित हरी पाटील.**

❖ **पद** : सहा.शिक्षक

❖ **संस्थेचे नाव** : ज्ञान सरिता शिक्षण संस्था.

❖ **शाळेचे नाव** : दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार हाय,राजापूर.

ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

❖ **नवोपक्रम गट** : माध्यमिक शिक्षक गट.

❖ **कायमचा पत्ता** : मु.पो.कुरुंदवाड

ता.शिरोळ.जि.कोल्हापूर 416106

❖ **शैक्षणिक अर्हता** : B.A.B.Ed,DSM.

❖ **नोकरी रुजू दिनांक** : 15/06/2000

❖ **एकूण सेवा** : 22 वर्षे

❖ **संपर्क क्रमांक** : 9420250878

❖ **ई-मेल आय डी** : jtpatil3@gmail.com

❖ **नवोपक्रमसाठी लागलेला कालावधी** : 5 महिने

❖ **नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या** :

# ❖प्रस्तावना❖

माझा नवोपक्रम सादरीकरण करण्यापूर्वी एक योगायोग सांगू इच्छितो माझ्या नोकरीची सुरवात सन 2000 मध्ये झाली आणि महाराष्ट्रामध्ये **पहिलीपासून इंग्रजी सुरवात सन 2000 पासूनच झाली** .या 22 वर्षे सेवेच्या कालवधी मध्ये **तालुकास्तरा पासून ते राज्यस्तरा पर्यंत** काम करण्याची संधी मिळाली आहे. प्रत्येक प्रशिक्षणा मध्ये काहीतरी नवीन शिकावयास मिळायचे.महाराष्ट्रातील Active Teachers व त्यांच्या विचारांची ओळख झाली.आपणही कांहीतरी नवीन कराव असे नेहमी वाटत असे. मग कधी **ज्ञान रचनावादी** पद्धतीने इंग्रजी अध्यापन केले.तर कधी **ABLम्हणजेच (Activity Base Learning)** पद्धतीने इंग्रजी अध्यापन केले.मना मध्ये एकच ध्यास होता.आपल्या शाळेमधील,तालुक्यातील,जिल्हातील व राज्यातील विद्यार्थी यांना इंग्रजी भाषा अध्ययन साठी **दीर्घकालीन** उपयोग होईल. कोरोनाचा कालावधी सुरु झाला. आणि मनातील विचारांना मूर्त स्वरूप येऊ लागलं. **Online Teaching करताना PPT ची निर्मिती केली.व ती राज्यातील सर्व Active Teachers पर्यंत Gmail मार्फत पाठवली.**कोरोना कालावधी मध्ये मनाशी खुणगाठ बांधली होती कि **आपल्या विद्यालया मध्ये इंग्रजी भाषा प्रयोगशाळा उभा करावयाचीच.**

आमच्या विद्यालयात आठवी ते दहावी वर्ग आहेत. आठवी म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा पाया होय.या मुलांचा इंग्रजी भाषेचा पाया भक्कम पक्का करावा. त्यासाठी इंग्रजीचे शैक्षणिक साहित्य निर्मिती, इंग्रजीची वेगवेगळी पुस्तके,बदलत्या प्रवाहानुसार Online Content निर्मिती व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तर हे विद्यार्थी जागतिक स्पर्धे मध्ये स्थान प्राप्त करतील यात तीळ मात्र शंका नाही. ‘English is the window to the world.’ त्यासाठी मुलांना वेगवेगळया सुविधा देणे क्रमप्राप्त आहे.मला सन 2021 पासून इयत्ता आठवीचा वर्ग व **वर्गशिक्षक पद कायम स्वरूपी देण्यात आलं**.गावाच्या नावानुसार गावाला वारंवार पुर या आपत्तीला तोंड द्यावे लागते. शाळेतील विद्यार्थ्यांची बोली भाषा कन्नड,मराठी,हिंदी व चौथ्या क्रमांकाला इंग्रजी आहे.म्हणजेच येथील **मुलांची इंग्रजी ही Fourth Language आहे**.या सर्व गोष्टीचा विचार करून शाळे मध्ये इंग्रजी भाषा प्रयोगशाळा उभी करावी असा मी संकल्प केला तर मुलांच्या मध्ये इंग्रजीची प्रथम आवड निर्माण करावी.इथे एक गोष्ट नमुद करावी अशी वाटते ती म्हणजे कि वय वर्ष 13 ते 14 या वयोगटातील मुलांना चांगल्या पद्धतीने आकार देता येतो.लहान वयात कोणत्याही नवीन गोष्टी मुले लगेच शिकतात जसे दुचाकी चालवणे. या गोष्टीचा विचार करून मुलांना इंग्रजी ची आवड निर्माण करण्यासाठी व इंग्रजी ची भीती कमी करण्यासाठी “इंग्रजी भाषा प्रयोगशाळा” शाळेत असावी अशा विचार मनात आला व **“Words Worth English Language Lab.” चा प्रवास सुरु झाला.**

## ❖अनुक्रमणिका❖


| अ.क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | नवोपक्रम शीर्षक | 6 |
| 2 | नवोपक्रम गरज व महत्व | 7 |
| 3 | नवोपक्रमची उद्दिष्टे | 8 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 8 ते 21 |
| 5 | नवोपक्रमची कार्यपद्धती | 22 ते 23 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्विता/फलनिष्पती (उद्दिष्टानुसार ) | 26 ते 28 |
| 7 | समारोप | 29 |
| 8 | संदर्भसूची व परिशिष्टे | 30 |

## ❖प्रतिज्ञापत्र❖

मी.**श्री.अजित हरी पाटील**. प्रतिज्ञापत्रप्रती लिहून देतो की,या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **"माझी इंग्रजी भाषा प्रयोग शाळा"** हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर अनुभवावर आधारित आहे.हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही.तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मी राबिवल्या कृती लिहिलेल्या आहेत.हा नवोपक्रम मी इतर कोणत्याही नवोपक्रम स्पर्धेसाठी अथवा MSCERTमार्फत आयोजित या पूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act1९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 20/11/2022



स्थळ : राजापूर

स्पर्धकाची स्वाक्षरी

## ❖प्रमाणपत्र ❖


प्रमाणित करण्यात येते की, श्री.अजित हरी पाटील हे माझ्या शाळेत कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"इंग्रजी भाषा प्रयोग शाळा" हा** नवोपक्रम त्यांनी स्वतः राबिवला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे . हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे मार्फत आयोजीत यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 20 /11 /2022

मुख्याधापक स्वाक्षरी/ नाव :

**श्री.एस.बी.मठपती**

स्थळ : राजापूर



1.नवोपक्रमाचे शीर्षक

# “माझी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा”




“ग्रामीण भागातील विद्यार्थांमध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण करून.भाषेची भिती कमी व्हावी म्हणून नाविन्यपूर्ण इंग्रजी भाषा प्रयोगशाळेची निर्मिती करणे.”

## ❖उपक्रमाची गरज व महत्व❖

### ❑ i) उपक्रम निवडण्याचे कारण :

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ हा **उगवत्या सूर्याचा तालुका** म्हणून ओळखला जातो.मात्र 2019 नंतर हा तालुका हा **पूरग्रस्थ** तालुका म्हणून ओळखू लागला. 2019 च्या अचानक आलेल्या पुरामध्ये **सर्व शैक्षणिक साहित्य खराब** होऊन गेले. या पुरात अनेक सेवाभावी संस्थानी, व्यक्तिगत, NGO यांनी खूप मोठ्या प्रमाणात मदत केली.2020 व 2021 मध्ये कोरोना आणि महापूर या आपत्तीत विद्यार्थांचे न भरून येणारे नुकसान झाले. 2021मध्ये पुन्हा पूर येऊन गेल्यामुळे **सर्व भौतिक सुविधा खराब झाल्या** व शाळा भकास झाली काही नवीन करण्याची मनात तयारी होत नसे.कारण पुन्हा मनात वारंवार येणाऱ्या पुराची भीती.

**या सर्व भौतिक सुविधा पुन्हा निर्माण करणे.**खराब झालेले शैक्षणिक साहित्य पुन्हा तयार करणे. विद्यार्थांच्या मध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण करणे.ग्रामीण भागामधील मुलांच्या मध्ये इंग्रजीची भिती कमी करणे. शालेय परीसरा मध्ये इंग्रजीचे वातावरण निर्माण करणे .दैनंदिन जीवनामध्ये इंग्रजीचा वापर नियमित व्हावा.**इंग्रजी या विषयाकडे एक विषय म्हणून न पाहता एक भाषा म्हणून पाहावे.** इंग्रजीचे अध्ययन अध्यापन आनंददायी करणे .इंग्रजी भाषा ही कृतीयुक्त पद्धतीने आत्मसात करावी. मुलांचा प्रत्यक्ष सहभाग,मुलांना वेगवेगळ्या कृती मध्ये गुंतवून ठेवणे.मुलांच्या मध्ये आत्मविश्वास,सृजनशीलता,अध्ययन रुची व विचारशीलता निर्माण करणे.**या साठी ‘ इंग्रजी भाषा प्रयोगशाळा ‘या नवोपक्रमाची निर्मिती झाली.**

### ❑ ii) उपक्रमाचे वेगळेपण :

सर्वत्र विज्ञानाच्या प्रयोग शाळा आहेत पण भाषा प्रयोगशाळा मात्र कमी प्रमाणात आहेत,किंबहुना नाहीतच.भाषा प्रयोग शाळेमध्ये **वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके आहेत**.ती हाताळण्यासाठी **कोणत्याही प्रकारचे बंधन नाही**. (Story,Grammar etc..) प्रयोगशाळेमध्ये मुलांना **अभिव्यक्त होण्यासाठी एक फूट बाय सहा इंच Wall Black बोर्ड उपलब्ध करून दिले आहेत**.या प्रयोगशाळेमध्ये **आधुनिक तंत्रज्ञानाचा** वापर केला आहे. T.V, Computer, Projector,Speaker,**Running Lighting Board** चा योग्य वापर. **डिजिटल पुस्तके**, वेगवेगळे APPs चा वापर .वीस प्रती **नवनीतचे शब्दकोश व दहा प्रती Oxfordचेशब्दकोष**.

**Online इंग्रजी News पेपर** चे वाचन व संग्रह.Digital Grammar Books बुक. Online टेस्ट ,**QR कोड** चा वापर करून टेस्ट सोडविणे.या उपक्रमा अंतर्गत मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून त्याला **तंत्रज्ञानाची जोड दिली आहे**. **प्रयोगशाळेतील साहित्याचा वापरून करून अध्ययन- अध्यापन प्रक्रिया आनंददायी वातावरणात पूर्ण करण्यासाठी उपयुक्त ठरला आहे.**

### ❑ iii) उपक्रमाची उपयुक्तता :

या उपक्रमामुळे मुलांची **इंग्रजीची भीती कमी झाली**.मुलांना इंग्रजी भाषेची **आवड निर्माण** झाली.मुलांची **L.S.R.W.C.**हि सर्व कौशल्य चांगली विकसित झाली.इंग्रजी **भाषा बोलण्याच्या व लिहिण्याचा आत्मविश्वास वाढला.**या उपक्रमाच्या अंतर्गत मुबलक प्रमाणत पूरक

असे ई-साहित्याची नवनिर्मिती केली.**सोबत QR कोड च्या सहाय्याने वापरण्यात सहजता व सुलभता आली.** ई-साहित्याचा वापर राज्याभरतील अनेक शिक्षक ,पालक व विद्यार्थांनी केला. या सर्व ई-साहित्य **Gmail द्वारे राज्यभरातील 500 शिक्षकांच्या पर्यंत पोहचविले**. ई-साहित्य हे Telegram app च्या Deshbhakat Education या Channel च्या माध्यमातून 500 च्या पेक्षा जास्त शिक्षकांच्या पर्यंत कोणतेही निर्बंध न घालता सार्वत्रिक केले आहेत . Click and join https://t.me/deshbhakteducationajitnitin . सर्वात जास्त आनंद हा होता की महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थी यांना या ई-साहित्याचा उपयोग झाला व करत आहेत. आणि भविष्यात देखील करतील म्हणून या उपक्रमाची उपयुक्तता आहे.

## 3.उपक्रमाची उद्दिष्टे :

- **इंग्रजी भाषेच्या पायाभूत भाषिक क्षमता साध्य करण्यासाठी योग्य वातावरण तयार करणे.**
- **माझी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा तयार करणे.**
- **भाषा प्रयोगशाळाचा उपयोग इंग्रजी भाषेच्या अध्ययन-अध्यापना साठी करणे.**

## 4.उपक्रमाचे नियोजन :

इंग्रजी भाषा प्रयोगशाळा तयार करण्यापूर्वी त्याचे कालबद्ध नियोजन करण्यात आले .नियोजनामुळे प्रयोगशाळा उभारणीचे काम सोपे झाले.**कोणत्याही उपक्रमाची यशस्वीता ही नियोजनावर अवलंबून असते.** उपक्रमाचे नियोजन माहे फेब्रुवारी 2022 ते ऑगस्ट 2022 या कालावधीत केले होते.

### ❑ i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :

ऑगष्ट 201९ व 2021 च्या पुरात शाळेच्या वर्ग खोल्यांचा रंग पूर्ण नाहीसा झाला होता. शालेय वातावरणा मध्ये उदासीनता आली होती.पुराच्या वर्गातील खुणा आणि मनातील खुणा कायम स्वरूपी नाहीश्या होण्यासाठी आपण काहीतरी नव निर्मिती करणे उचित वाटत होते.मुलांच्या मनामध्ये सुद्धा सारखीच परीस्थिती होती.उपक्रम राबविण्या पूर्वी मी माझ्या निरिक्षणातून पडताळा सूचीच्या आधारे उपक्रम पूर्व स्थितीचे निरिक्षण खालीलप्रमाणे केले आहे.

**पडताळा सूची**

| अ.नं. | विधान | होय/ नाही |
|---|---|---|
| 1 | मुलांचे दैनंदिन अध्यापन सुरु होते . | होय |
| 2 | मुलांना इंग्रजी बातम्या ,गोष्टी,Podcast,ऐकण्याची संधी होती . | नाही |
| 3 | इंग्रजीतील पायाभूत संकल्पनाचा विसर पडला होता . | होय |
| 4 | मुलांच्या मध्ये इंग्रजी भाषेची भीती होती. | होय |
| 5 | मुलांचे Listening कौशल्य विकसित झाले होते. | नाही |
| 6 | मुलांचे Speaking कौशल्य विकसित झाले होते. | नाही |

| | | |
|---|---|---|
| 7 | मुलांचे Reading कौशल्य विकसित झाले होते. | नाही |
| 8 | मुलांचे Writing कौशल्य विकसित झाले होते. | नाही |
| 9 | मुलांचे Conversation कौशल्य विकसित झाले होते. | नाही |
| 10 | पालकांना मुलांच्या इंग्रजी भाषेची काळजी वाटत होती. | होय |
| 11 | मुलांना इंग्रजी शब्दकोष वापरता येत होता . | नाही . |
| 12 | इंग्रजी ग्रामरची भीती वाटत होती . | होय |
| 13 | मुलांचे हस्ताक्षर वळणदार होते. | नाही |
| 14 | मुलांना Proverb इंग्रजीतून मातृभाषे मध्ये रूपांतरित करत होते. | नाही |
| 15 | मुलांची इंग्रजी भाषा शिकण्याची इच्छा होती | होय |

### ❑ ii) संबधित व्यक्तीशी,तज्ज्ञांशी चर्चा :

या उपक्रमा बाबत सर्वप्रथम संस्थेचे **चेअरमन :** श्री.आय.एन.हिंगमिरे, **सेक्रेटरी :** श्री.के.एस.मठपती (निवृत्त इंग्रजी शिक्षक ), शाळेचे **मुख्याध्यापक**:श्री.एस.बी.मठपती, सहकारी शिक्षक, पालक,आजी माजी विद्यार्थी यांच्याशी नवोपक्रमाची गरज, स्वरूप,अंबलबजावणी या अनुषंगाने चर्चा केली.**इंग्रजी भाषा प्रयोगशाळा सुरु करण्यापूर्वी राज्यातील इंग्रजी विषय शिक्षक यांच्याशी चर्चा करून त्यांची मते विचारत घेतली.**त्या मध्ये खालील मान्यवर शिक्षक.

**1)मा.श्री.श्रीशैल मठपती (शिरोळ)** **2)मा.श्री.नितीन परीठ. (शिरोळ )**

**3)मा.श्री.संजय चव्हाण. (चिपळूण)** **4) सौ.मेघा मोरे . (शिरोळ)**

**5) मा.श्री.बसागरे सर. (करवीर)** **6)मा.श्री.प्रविण पानपाटील(नाशिक)**

**7) मा.श्री.शरद गुढके (सोलापूर)** **8)मा.श्री.बाबासाहेब कदम.(शाहुवाडी)**

**9)मा.श्री.विनोद पाटील (शिरोळ)** **10) मा.श्री.मुकुंद माळी सर (शिरोळ)**

**11) मा.श्री. हेमंत तेलवेकर (शिरोळ)** **12) मा.श्री.जितेंद्र काटकर (जयसिंगपूर)**

### ❑ नवोपक्रमासाठी सहकार्य व मार्गदर्शन:

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूरचे प्राचार्य **मा.श्री.डॉ.आय.सी.शेख. मा.सौ डॉ. अंजली सतीश रसाळ.**(जेष्ठ अधिव्याख्याता डाएट कोल्हापूर,) व **सौ.सरिता कुदळे**(अधिव्याख्याता डाएट कोल्हापूर) व **इतर सन्मानीय अधिव्याख्याते** यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली.ई साहित्य वापरत असलेल्या **राज्यभरातील सर्व शिक्षक,पालक यांचे प्रोत्साहन मिळाले**.हा उपक्रम अधिक प्रभावी ठेवण्यासाठी शिक्षक,पालक यांच्याशी सुसंवाद ठेवला आहे.

या नवोपक्रमासाठी **श्री. डी. एल .कामत** (गटशिक्षणाधिकारी पं.स शिरोळ) **श्री. ए.एस ओमासे** (बीट विस्तार अधिकारी) **श्री.सुरेश कोळी.**(केंद्र समन्वयक) केंद्र अकिवाट,**श्रीमती एन.एच काझी** (विषय तज्ञ गट साधन केंद्र शिरोळ) यांचे मार्दर्शन व प्रेरणा मिळाली.सदर नवोपक्रम अधिक प्रभावी कसा राबविता येईल या विषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले.**मा.श्री.नितीन परीट (सर) यांनी PPT तयार करण्यासाठी विशेष मदत केली.**

## ❑ iii) आवश्यक साधनांची निर्मिती व विचार :

या उपक्रमा मध्ये सर्व प्रथम भौतिक सुविधा उपलब्ध करणे व त्याची योग्य प्रकारे मांडणी करणे सर्वात महत्वपूर्ण गोष्ट होती.या कृतीयुक्त उपक्रमासाठी विविध प्रकारची साधने व साहित्य लागणार होती. **सहजपणे व कमी खर्चात उपलब्ध असणाऱ्या साहित्यांचा वापर करण्यात आला.**उदा.फोल्डर,रंगीत खडू,फाईल ,मार्कर पेन .नॉर्वे पेपर यांच्या पासून कांही कार्ड व पोस्टर तयार करावी लागणार होती.याची सर्व कल्पना पालकांना व मुलांना Whatsapp group मार्फत दिली.

इंग्रजी भाषा प्रयोगशाळे मध्ये आवश्यक असणाऱ्या **PPT,Google form,Pdf स्वरुपात टेस्ट, व Document तयार करण्यात आले**. या सर्वाचा प्रभावशाली वापर होण्यासाठी **QR कोड** ची सुविधा देण्यात आली.या सर्व E साहित्याचा वापर होण्यासाठी **राज्यभरातील इंग्रजी शिक्षकांचे 500 E-mail एकत्र करून** शिक्षकांना PPT सेंड केल्या. **Telegram Channe वरती (515 शिक्षक विद्यार्थी join आहेत.)** सर्व ई साहित्य प्रकाशित केले. प्रयोगशाळा सजावट करण्यासाठी डिजिटल चार्टचा वापर सुयोग्य करण्यात आला आहे. पालक,विद्यार्थी, शिक्षक यांना उपक्रमा विषयी माहिती देण्यासाठी YOU TUBE CHANNEL चा वापर करण्यात आला.**आजच्या घडीला 1805 Views आहेत.**

ABLकार्ड LAMINATION करून घेतली आहेत. त्यामुळे त्यांचा वापर वारंवार करता येतो. सर्व प्रिंटेड XEROX वेगवेगळया टाकाऊ साडी BOX मध्ये ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे त्या प्रिंटेड XEROX पुनःपुन्हा वापरता येतात. भाषा प्रयोगशाळे मध्ये सुंदर असे काचेचे **Listening Corner, Speaking Corner, Reading Corner व Writing Corner** ची निर्मिती केली आहे. अनुभवी व निवृत्त शिक्षकांची मते ही विचारात घेतली आहेत.

## ❑ साधनांची निर्मिती :

1) Bilingual chart : सर्व प्रथम इंग्रजी मधील quotes एकत्र केले व त्यांचे मराठीत भाषांतर करून डिजिटल चार्ट तयार केले.

2) स्व:निर्मित P.P.T: इयत्ता 8,9 व 10 वी च्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील सर्व धडे व P.P.T.अतिशय सुंदर पद्धतीने Animation देऊन तयार केल्या आहेत.

3) स्व:निर्मित ABL Card : 5 वी ते 7 मधील इंग्रजी मधील मुलभूत घटक समजण्यासाठी ABL कार्ड तयार स्व : निर्मित तयार केले आहेत.

4) Grammar Made Easy for everybody: प्रा.सावंत सर यांच्या पुस्तकांचा वापर व्याकरणाचे अध्यापन करतांना केला जातो.

5) Navneet Advanced Dictionary: **(English to English to Marathi)** चा वापर दैनंदिन अध्यापनात केला जातो.मुलांना Dictionary Work दिले जाते.

6)Story book for kids: ऑफ तासाला मुलांना इंग्लिश स्टोरी बुक वाचण घेतले जाते.

7) Superb English Grammar book Part I toV:

ही पुस्तके Internet वरून downloadकरून त्या बुक च्या xerox करून घेऊन त्याचा सराव करून घेतला जातो.

8) Cursive letter slate: जर शनिवारी पहिला तास Cursive letter writing सराव घेतला जातो.

9) Acrostic Chart: हा एक कविता लिहिण्याचा प्रकार आहे. नमुन्यादाखल प्रयोगशाळा मध्ये Acrostic Chart लावला .

10) Running Lighting Board: वरती दररोज एक proverb सेट केली आहे.Proverb a day हा उपक्रम चालू आहे.

11)Adjective Number plate on Bench: सर्व प्रथम 26 Adjective मुलांना विचारून एकत्र केली.त्याची यादी बनवली.Alphbetical Order लावली.त्याच्या Digital Sticker तयार करून Bench समोरील बाजूला चिकटवले.

12) World Clock : स्था.वेळ व प्र.वेळ व Time telling शिष्यवृत्ती घटक चांगल्या प्रकारे शिकविण्यास एक चांगले शै.साधन प्राप्त झाले आहे.या घड्याळ्या मुळे इंग्रजी व भूगोल या विषयामुळे चांगला समवाय साधला गेला.

## ❖करावयाचच्या कृतींचा निश्चित केलेला क्रम:

1) 'कोरोना'व 'महापूर' आपत्ती नंतर इयत्ता आठवीच्या मुलांच्या इंग्रजी भाषा अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या **समस्यांचा शोध** घेतला.

2) प्राप्त परिस्थितीत समस्याचे निराकरण करण्यासाठी **संस्था व पालक यांच्याशी संवाद** साधून आवश्यक कार्यक्रमाचे नियोजन केले.

3)माध्यमिक स्तरावर अध्ययन प्रक्रिया सहज ,सुलभ व कृतीयुक्त आणि दिर्घकालीन परिणाम होण्यासाठी **इंग्रजी भाषा प्रयोगशाळेचा वापर केला.**

4)विद्यार्थांना इंग्रजी भाषेची **आवड निर्माण** होईल.पायाभूत भाषिक क्षमता व अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य होईल .अशा **कृतीशील उपक्रमांची यादी** करून त्यांचा नियोजनात समावेश केला.

5) इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यासाठी विविध साहित्याचा वापर करून आवश्यक कृती आणि सराव करून घेतला.

6) **ABLकार्डचा वापर** करून विविध ज्ञानरचनावादी कृती मध्ये सहभाग करून घेतला.

7)Side Words **शब्द कार्डचा** वापर करून वाचन लेखन सराव करून घेणे.**शब्द निर्मिती** तसेच शब्द लेखन साहित्य वापरातून पायाभूत भाषिक क्षमता प्राप्त झाल्या.

8) **<u>प्रोजेक्टर,स्मार्ट टी.व्ही.तथा स्मार्ट मोबाईल या सारख्या ICT</u>** साधनांची उपलब्धता करून त्यांच्या सहाय्याने प्रभावशाली अध्ययन अनुभूती व आंतरक्रिया साध्य केली.

9) शालेय परिसरातील **वस्तूंचा वापर करून शब्द संग्रह वाढविला** .

10)दैनंदिन जीवनामध्ये इंग्रजी भाषेचा सुयोग्य वापर होऊन **इंग्रजी भाषा साक्षरता दृढ** व्हावी यासाठी संधी उपलब्ध करून दिली .

**11) वाढदिवसाचे औचित्य साधून English Lab मध्ये एक शैक्षणिक साहित्य भेट** उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहिलो.

12)भाषा समृद्धी करिता अवांतर वाचन करण्यासाठी आवश्क साहित्य व संधी उपलब्ध करून देणे. जुनी इंग्लिश वर्तमान पत्रे ,**Online English पेपर,story book,यांचा वापर केला.**

## ❑ v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

- ✓ मुलांना **इंग्रजी ऐकण्याची संधी मिळाल्या मुळे आवड निर्माण झाली**. इंग्रजी बातम्या ऐकण्याची संधी मिळाली.**लहान गोष्टी मुलांना समजू लागल्या.**इंग्रजी मधील सूचना समजू लागल्या.
- ✓ मुलांना **पायाभूत** संकल्पना समजल्या.
- ✓ मुलांच्या मध्ये इंग्रजी भाषेची **भीती** नाहीशी झाली.
- ✓ मुले आपापसात लहान **संवाद** इंग्रजी मध्ये करू लागली.
- ✓ **स्वता:ची ओळख** इंग्रजी मध्ये सांगू लागली.
- ✓ विद्यार्थांचा **वाचन** सुधारले.जे विद्यार्थी वाचणामध्ये मागे असणार्या मुलांच्या त्यांच्या मध्ये विशेष बदल झाला.
- ✓ सरावाने विद्यार्थांचा **आत्मविश्वास** वाढला.
- ✓ मुलांना इंग्रजीचा **शब्दकोश** वापरु लागली.
- ✓ विद्यार्थी **लहान लहान वाक्ये** तयार करू लागली.
- ✓ संगणकाचा वापर करून Running Lighting Borad मध्ये **Proverb** लिहू लागली.
- ✓ इंग्रजी विषयाची माध्यमिक स्तरावरील **पायाभूत** तयारी योग्य झाली.
- ✓ PPT वापर अध्ययन प्रक्रियेमध्ये झाल्यामुळे मुलांना **अध्ययन सुलभ** झाले.
- ✓ **ABL कार्डच्या** वापरा मुळे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमा मध्ये सेतू तयार झाला.
- ✓ संगणकाचा वापर करून मुले **Online टेस्ट** सोडवू लागली.
- ✓ **Google form टेस्ट** सोडविल्यामुळे परिक्षेत आत्मविश्वास वाढला.
- ✓ कृतियुक्त अध्यापनामुळे मुले आनंदाने **Activity मध्ये भाग** सहभागी होऊ लागली.
- ✓ शिक्षणात **तंत्रज्ञानाचा** वापर प्रभावीपणे करण्याचे कौशल्य पालकांच्या व विद्यार्थांमध्ये वाढले.
- ✓ माध्यमिक स्थरावरील इंग्रजीचा **पाया भक्कम झाला**.
- ✓ विद्यार्थांचा इंग्रजी भाषेचा **शब्द संग्रह वाढला.**

- ✓ विद्यार्थी इंग्रजी व्याकरणाचे विविध घटक उदा.Albhabetical Order,Punctuation, Parts Of Speech वापर करू लागली.
- ✓ <u>इंग्रजी कडे विषय म्हणून न पाहता भाषा म्हणून पाहू लागली व शिक्षणाची गोडी वाढली.</u>

### ❑ vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक )

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये इंग्रजी भाषेची भीती कमी करून आवड निर्माण करणे.माध्यमिक स्तरावरील इंग्रजी भाषेचा पाया भक्कम करणे यासाठी आज अखेर केलेले प्रयत्न,कार्यक्रम व महत्वपूर्ण टप्पे खालीलप्रमाणे......

| अ.क्र. | कार्यवाही /उपक्रम अंतर्गत कृती | कालावधी |
|---|---|---|
| 1 | संस्थेचे चेअरमन , सदस्य ,मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक यांच्याशी चर्चा. | फेब्रुवारी2022 |
| 2 | पालक सभा आयोजन व नवोपक्रमाची माहिती देणे. | फेब्रुवारी 2022 |
| 3 | तज्ज्ञांशी चर्चा. | 1ते15मार्च 2022 |
| 4 | तज्ज्ञांच्या मदतीने लागणाऱ्या भौतिक साधनांची यादी बनविणे. | 15ते20 मार्च 2022 |
| 5 | तज्ज्ञांच्या मदतीने शैक्षणिक साधन सामुग्रीची यादी बनविणे. | 20ते22 मार्च 2022 |
| 6 | वर्ग रंगरंगोठी करून घेणे. | 23ते30मार्च 2022 |
| 7 | Listening,Speaking,Reading, Writing कॉर्नर तयार करणे. | 1ते15 एप्रिल 2022 |
| 8 | स्व निर्मित ABL कार्ड तयार करणे. | 16ते30एप्रिल2022 |
| 9 | कार्ड Lamination करून घेणे. | मे 2022 |
| 10 | पुस्तके व Dictionary साहित्य खरेदी करणे. | मे 2022 |
| 11 | स्व;निर्मित PPT तयार करणे. | मे 2022 |
| 12 | Google form टेस्ट तयार करणे. | 1ते 15 जून |
| 13 | पूर्व चाचणी Superb इंग्लीश ग्रामर पुस्तकावर आधारित . | जुलैपहिला आठवडा |
| 14 | Superb इंग्लीश ग्रामरपुस्तकांची download व Xerox व अध्ययन . | जुलै दुसरा आठवडा |
| 15 | उत्तर चाचणी Superb इंग्लीश ग्रामर पुस्तकावर आधारित | 13 ऑगस्ट 2022 |
| 16 | Running Lighting Board खरेदी . | ऑगस्ट 2022 |
| 17 | Side Words,द्विभाषिक Digital चार्ट बनविणे. | ऑगस्ट 2022 |
| 18 | वर्गात अध्ययन सुलभ आणि पोषक वातावरण करणेसाठी Running Lihgting बोर्ड सारख्या वस्तू लोकसहभागातून पूर्णत्वास नेणे. | ऑगस्ट 2022 |

## ❑ vii) उपक्रमासाठी इतरांची मदत.

राजापूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर,येथे माझी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा नवोपक्रम राबिवताना नियोजनापासून अंमलबजावणी पर्यंत अनेक थोर **शिक्षण तज्ज्ञ व दानशूर दाते यांची मोलाची मदत झाली आहे.**

या नवोपक्रमासाठी मोलाचे सहकार्य मा.श्री.नितीन परीट.सर,हसूर हायस्कूल हसूर ता.शिरोळ.जि.कोल्हापूर.PPT व Google Forms तयार करण्यासाठीची त्यांची मदत अनमोल आहे.

### नवोपक्रमासाठी पुढे आलेले मदतीचे हात .(चळवळ लोक सहभागाची )

| अ. क्र. | सन्माननीय देणगीदार | गाव | देणगीचा तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.संजय विष्णू पाटील. | अकिवाट | कलर साठी | 3000 |
| 2 | श्री. संतोष कांबळे | राजापूर | मजुरी Painter | 2000 |
| 3 | श्री. अजित बेरड. | अकिवाट | फॅन नग 2 | 2000 |
| 4 | कु.वैष्णवी कदम,वैष्णवी पाटील.अंकिता,अदिती व सृष्टी बेरड | अकिवाट | Tube Light | 1000 |
| 5 | श्री.महावीर बस्तवाडे. | ज.पूर | खिडकी पडदे | 5000 |
| 6 | श्री.संजय खोकाटे | अकिवाट | Running बोर्ड | 4000 |
| 7 | श्री.रमेश मठपती | राजापूर | शब्दकोश | 2000 |
| 8 | कु.सृष्टी गुरव. | राजापूर | Grammar बुक | 200 |
| 10 | कु.अपूर्वा व सेन्हल | राजापूर | World Clock | 701 |
| 11 | कु.साकीब खनदाळ | राजापूर | Slate | 800 |
| 12 | कु.विघ्नेश कोळी | अकिवाट | Adjctive plate | 200 |
| 13 | कु.आदित्य पाटील | राजापूर | sound | 5000 |
| 14 | कु.आदर्श पाटील | कुरुंदवाड | प्रोजेक्टर Stand | 1300 |
| 15 | श्री.हरी दत्तू पाटील | कौलगे | Light फिटिंग | 5000 |
| 16 | श्री.अनिल हरी पाटील | कोल्हापूर | Lamination | 2000 |
| 17 | श्री.दरीगोंडा,श्रीगोंडा महादेव पाटील | राजापूर | smart TV | 25000 |

## viii) नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे.

**1) सदरच्या नवोउपक्रमासाठी आर्थिक मदत संकलन करून त्यांना सोशल मिडीयाच्या (Whatsapp,telegram,facebook,) माध्यमातून प्रसिद्धी दिली गेली त्यांचे पुरावे.**

❑ इंग्लिश लँग्वेज लॅब ची रंगरंगोटी ❑




**दिनांक : 28/02/2022** दिशा शिक्षणाची ! चळवळ लोकसहभागाची !

**मा.संजय विष्णू पाटील** (प्रोपा.संजय किराणा स्टोअर) रा. अकिवाट यांच्याकडून आपला भाऊ **कै.अनिल विष्णू पाटील यांच्या स्मरणार्थ आठवीच्या वर्ग रंगरंगोटी करण्यासाठी 10 लिटर नेरोलॅक कंपनीचा प्रायमर,4 लिटर ऑईल Paint, व 1 लिटर blackboard colour अशी 3000 रुपये किमतीची अनमोल भेट** ! ▪पाटील कुटुंबाचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार ! 'दिली ऑईल Paint ची भेट सुंदर, ज्ञानमंदिर सजले सुंदर ! ज्या घरातील मुले शाळेत येतात. त्या घरातील लोकांचे हात शाळेसाठी मदत करायला नेहमीच पुढे सरसावलेले असतात असे म्हणणारे व लोक सहभागाचा श्रीगणेशा करणारे मा.संजय विष्णू पाटील.रा. अकिवाट.आपण दिलेल्या colour मुळे 2019 व 2021 च्या **पुराच्या खुणा कायम स्वरुपी मिटून गेल्या हे तितकंच खरं.** ❑

इंग्लिश लँग्वेज लॅब साठी कर्टनची उपलब्धता. ❑




*फायनल लूक *

दि.27/03/2022

सकाळाची शाळा सुरु झाली होती . वर्गाची रंगरंगोटी झाली होती. आपण आपल्या शाळेमध्ये नवीन **DreamProject (English Language Lab) सुरु करावा मनात विचार आला.** Lab सुरु करावी तर त्याला आकर्षक पडदे असयला हवे असा मनात विचार आला .मग हे पडदे कुणाकडे मिळणार ? असा प्रश्न मनामध्ये आला .लागलीच माझ्या घरामध्ये ज्यांनी सोफा,पडदे बसविण्यात आले त्यांना Call केला.**मला Blind प्रकारचे पडदे lab साठी हवे आहेत.** किती खर्च येईल .तर मा.श्री.महावीर बस्तवाडे यांनी अंदाजे एका खिडकीस 5000(5000 x 3 =15000 रुपये लागतील असे सांगितले. मी लगेच उत्तर दिले कि मला एका पालकांनी इतकी रक्कम दिली नाही.विचारणा केली कि साधे पडदे बसविण्यासाठी किती खर्च येईल ? एका क्षणाचा ही विलंब न लावता सर मी तीनही खिडक्या पडदे मी लावून देतो. **अतिशय सुंदर मोहक पडदे ज्यामुळे आता मुले म्हणणार नाहती की मला ब्लॅक बोर्ड वरील दिसत नाही**.

**खालील लिंक क्लिक करून व्हिडिओ पहा.**

https://youtu.be/l6T-ULFgFV0

### ❑इंग्लिश लँग्वेज लॅब साठी Adjective Plate. ❑




कु.विघ्नेश बंडू कोळी इयत्ता आठवी यांनी आपल्या वाढदिनी दिली रक्कम * Adjective Name Plate On Bench.* खर्च या रक्कमेतून करा सर. सर्व प्रथम A to Z adjective चे collection केले त्यांची स्टीकर तयार केली.नंतर 26 बेंच मांडणी केली.त्यावर डिजिटल स्टिकर paste केली.त्याचा फायदा असा झाला कि मुलांना Adjective ,Alphabetical order व Describing word चांगल्या पद्धतीने समजतात व सजावट हि चांगल्या प्रकारे झाली आहे. **पुढील लिंक ला** Click करा Video पहा. https://youtu.be/0J3ZOEbTDmU

### ❑इंग्लिश लँग्वेज लॅब साठी रनिंगलाइटिंग बोर्ड. ❑

दिनांक: 29/03/2022




हो आपल्याला सर्वांना ब्लॅकबोर्ड,स्मार्ट बोर्ड, माहिती आहेच.चला तर मग समजून घेऊया वैशिष्ट्ये RUNNING LIGHTING BOARD ची:1) सर्व काही Off-line सेट करता येते. 2) वाय-फायची सुविधा 3) मल्टी कलर. 4) टाईम/Date सेटिंग करता येत. 5) लाईट खूप कमी लागते . 6) मुले स्वतः हाताळू शकतात.7) खुप चांगला सराव मुलांच्या कडून घेता येतो. 8) Low Price , High benefit 9) दृश्य स्वरूपात एखादी गोष्ट पाहिली की जास्त काळ लक्षात राहते. 10) तारखेनुसार अगोदरच आपला मजकूर टाईप करता येतो उदा : आजचा सुविचार, Today's Proverb, Just New word for a day, Question a day etc.....

### ❑ इंग्लिश लँग्वेज लॅब साठी Oxford Dictionary भेट.❑

दिनांक: 31/03/2022

**English Language Lab ची संकल्पना खूपच सुदंर आहे !!**




असा एक मॅसेज व्हॉट्स ॲप वरती आला आणि विचारणा झाली लँग्वेज लॅब चे उद्घाटन कधी आहे. मी उत्तर दिले की एप्रिल च्या शेवटच्या आठवड्यात होईल.थोडे साहित्य आले आहे.थोडे लागणार आहे. सर मी सुद्धा खारीचा वाटा उचलणार आहे. मी थोडे पैसे बचत केले आहेत व थोडे माझे वडील देणार आहेत . मी हे सर्व ऐकल्यानंतर निरुत्तरीत झालो.सर ...सांगा काय लागणार आहे? मी लगेच उत्तर दिलं ते म्हणजे डिक्शनरी. मग Dictionary कोणत्या प्रकारची घ्यायची .?OXFORD ENGLISH- ENGLISH-MARATHI आम्ही लॅब साठी दहा ऑक्सफर्ड शब्दकोश देऊ.English language is the window of the world असे म्हणतात कारण जगात सर्व देशात वापरली जाणारी भाषा.आणि या भाषेवर प्रभुत्व मिळवाचे असेल तर शब्दसंग्रह वाढला पाहिजे , शब्दांचा अर्थ समजले पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करून लॅब मध्ये ऑक्सफर्ड डिक्शनरी ची भेट म्हणजे एक अनोखी पर्वणीच असेल.

❑ इंग्लिश लँग्वेज लॅब साठी WORLD CLOCK भेट.❑




राजापूर.दि:06/06/2022 : WORLD CLOCK ची प्रतिक्षा संपली ज्या शाळेत आपल्या मुले-मुली शिकतात त्या शाळेचे आपण काहीं तरी देणे लागतो या उदात्त भावनेने पालक वर्ग एकत्र येतो तिथे त्या शाळेची प्रगती होत असते.याचे मूर्तीमंत उदाहरण द्यायचे झाले तर कुंभार हायस्कूल राजापूर. या शाळेतील मुलांनी आपला वाढदिवस अगदी साधे पणाने साजरा करतात तर काहींजन साजराच करत नाहीत. वाढदिवसाला येणारा खर्च शाळेच्या प्रगतीस दिला जातोय. *WORLD CLOCK ची संकल्पना आली तरी कशी.?तर, फेब्रुवारी महिन्यात NMMS ची तयारी करत असताना स्था. वेळ व प्रमाण वेळ या प्रकरणाची उजळणी चालू होती. *कु.स्नेहल लोळसुरे व साक्षी कट्टी या दोन मुली आपल्या वाढदिवसाची चॉकलेट वर्गात वाटत होत्या.त्या क्षणी आम्ही त्यांना विनंती केली की वर्गात तुम्हा दोघींच्या कडून घड्याळ हवे आहे.एका क्षणाचा विलंब न लावता त्यांनी हो हो...आम्ही घड्याळ देऊ असे सांगितले. खूप वेळ (3 Months) सर्च केल्यानंतर योग्य घड्याळ मिळाले. ऑर्डर onlineदिली होती (रुपये 699)ती रक्कम 701 रुपये शाळेकडे दिली आहे. खूप सुंदर असे घड्याळ शाळेस प्राप्त झाले आहे. स्था.वेळ व प्र.वेळ व Time telling शिष्यवृत्ती घटक चांगल्या प्रकारे शिकविण्यास एक चांगले शै.साधन प्राप्त झाले आहे.या घड्याळ्या मुले इंग्रजी व भूगोल या विषयामुळे चांगला समवाय साधला गेला.

SCAN And CLICK https://youtu.be/jY5BhWuWq0U

❑ इंग्लिश लँग्वेज लॅब साठी Grammar बुक भेट.❑

#दि.06 एप्रिल 2022




☐कु. सृष्टी श्रीधर गुरव इयत्ता : आठवी यांच्या वाढदिवसानिमित्त आमच्या *दे.भ.रत्नापान्ना कुंभार हायस्कूलच्या मुलांच्या साठी इंग्लिश ग्रामर' पुस्तिका घेण्यासाठी रक्कम दिल्याबद्दल 'गुरव' परिवाराचे मनःपूर्वक आभार !*

